# ओएनजीसी (डब्ल्युओयु) कर्मचारी संघटना

मान्यता प्राप्त युनियन

दिनांक 13.02.2018

**दिनांक 6 फेब्रुवारी, 2018 रोजी झालेल्या**

**पे-रिव्हीजनच्या मिटींगचा वृत्तांत**

बांधवानों आणि भगिनींनो,

देहरादून येथे दिनांक 6.02.2018 रोजी सर्व मान्यताप्राप्त युनियन्स व मॅनेजमेंट यांची पे-रिव्हीजन संदर्भातील पहिली सभा संपन्न झाली. तत्पूर्वी म्हणजेच 05.02.2018 रोजी सर्व मान्यता प्राप्त संघटनानी देहरादून येथे एकत्र येवून पूर्ण दिवसभरामध्ये पे-रिव्हीजनबाबतीत आपला कॉमन एजंडा तयार करुन तो 6 फेब्रुवारीला दिल्ली येथे मा श्री डी डी मिश्रा, डायरेक्टर (एचआर) यांना सादर केला.

कर्मचारी संघटना व इतर मान्यताप्राप्त युनियन्सनी यापूर्वीची दोन पे-रिव्हीजन केली त्यास साधारण प्रत्येकी तिन-तिन वर्षाचा कालावधी लागलेला होता. त्यावेळी विलंब झालेला असला तरी देखील परिपूर्ण पे-रिव्हीजनसोबत तिन वर्षाच्या पूर्ण कालावधीची कमाल पाच ते सहा लाखापर्यंत थकबाकीची रक्कम कर्मचा-यांना मिळाली होती. या वेळी मॅननेजमेंटने बैठकीमध्ये स्पष्ट केले कि भारत सरकारच्या विभागाकडून आम्हांस स्पष्ट सुचना आहेत कि येत्या सहा महिन्यात पे-रिव्हीजनबाबतीत चर्चा पूर्ण करुन पे-रिव्हीजनचा अंतीम करारनामा करावा. यामुळे पूढील होणा-या वेतनवाढीच्या बैठका लवकारात लवकर करण्यासाठी कर्मचारी संघटना प्रयत्नशील राहील सरकार व मॅनेजमेंटच्या या धोरणामुळे यावेळी होणारे पे-रिव्हीजन लवकरच होईल याची कर्मचारी संघटनेस खात्री वाटते.

या सभेमध्ये सर्व मान्यताप्राप्त युनियन्सचे पुढील गोष्टीवर एकमत झाले कि ओएनजीसी कंपनी सर्व सार्वजनिक क्षेत्राच्या तुलनेमध्ये Profit Making कंपनी असल्यामुळे पब्लीक सेक्टर मधील इतर Profit Making कंपन्या पेक्षा अधिक प्रमाणात ओएनजीसी कामगारांना पे-रिव्हीजनमध्ये सवलती मिळाल्या पाहीजेत व यासाठी सातत्याने पे-रिव्हीजनच्या मिटींग घेऊन कोणतीही कसर रहाता कामा नये यासाठी कर्मचारी संघटना सतर्क रहाणार आहे तरि सुध्दा IOC, BPCL, HPCL या कंपन्यांच्या अंतीम पे-रिव्हीजन नंतरच ओएनजीसीच्या सर्व मान्यताप्राप्त युनियन वेतनवाढीच्या करारावर सहया करतील व या निर्णयास मॅनेजमेंटने सुध्दा अनुकुलता दर्शविलेली आहे

सभेच्या दुस-या दिवशी म्हणजे 7.02.2018 रोजी सर्व मान्यताप्राप्त युनियन्सनी दिल्ली येथे येवून चेअरमन साहेबांची भेट घेवून एमओयू 2004, टॉपमन तसेच सेफ्टी किट्स व सेफ्टी संदर्भात बनविलेल्या कमिटी द्वारा निर्णय घेण्यास मॅनेजमेंटकडून फारच विलंब होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. चेअरमन साहेबांनी या सर्व कमिटीस आपले संबंधीत अहवाल त्वरीत तयार करुन अंतीम निर्णय घेण्याविषयी चीफ (ईआर) श्री अलोक मिश्रासाहेबांना निर्देश दिलेले आहेत.

एमओयू 2004 च्या निर्णयास विलंब होत असल्याकारणाने कर्मचारी संघटनेने ॲक्शनप्लॅनबाबत मा. चेअरम साहेबांना पत्र दिले होते यावर देखील चर्चा होवून मा. चेअरमन साहेबांनी आश्वासीत केलेले आहे. लवकरच एमओयू 2004 च्या संदर्भात मॅनेजमेंट बैठकीची तारीख देत असुन त्यात अंतीम निर्णय अपेक्षीत असल्यामुळे कर्मचारी संघटनेने आपला ॲक्शन प्लॅन स्थगीत ठेवावा अशी विनंती करण्यात आली व त्याप्रमाणे श्री ए. के. अग्रवाल, जीएम (एचआर) यांनी युनियनच्या नावे पत्र ही दिलेले आहे.

यापूर्वी एमओयू 2004 च्या संदर्भातील अन्यायाविरोधात कर्मचारी संघटनेने रिजनल लेबर कमिशनकरकडे देखील दावा दाखल केलेला असुन मॅनेजमेंटकडून या बाबतीत खुलासा मागविलेला आहे. मॅनेजमेंटच्या विरोधात संप किंवा ॲक्शन प्लॅन करण्यापूर्वी त्याची आगावू सुचना हि रिजनल लेबर कमिशनरला द्यावी लागत असल्यामुळे कर्मचारी संघटनेने देखली सदर ॲक्शन प्लॅनबाबत लेबर कमिशनरला लेखी कळविलेले आहे. मॅनेजमेंटने या विषयी लवकर निर्णय घेण्यासाठी कर्मचारी संघटनेला लेखी स्वरुपात आश्वासन देवून त्याप्रकारचे पत्र त्वरीत दिलेले असताना देखील ॲक्शनप्लॅन करणे हे लेबर कमिशनरच्या परीने उचीत नसुन आपला मुळ उद्देशाला अडचणीत आणणारे आहे. त्यामुळे सदर ॲक्शन प्लॅन काही कालावधीसाठी स्थगीत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

16 फेब्रुवारी, कलकत्ता येथे व 27 फेब्रुवारी, 2018 रोजी अहमदाबाद, मेहसाना येथे मान्यता प्राप्त युनियन ठरविण्यासाठी गुप्त मतदान पध्दतीची निवडणुक होत असुन निवडणूकीसाठी नोटीफीकेशन निघालेले आहे, निवडणूकीच्या तारखाही जाहीर झालेल्या आहेत या दोन्ही राज्याचे जनरल सेक्रेटरी या कालावधीत एमओयूच्या मिटींगमध्ये उपस्थित राहीलेले नाहीत. 27 फेब्रुवारीनंतर त्वरीत एमओयू ची मिटींग लावण्याचे मॅनेजमेंटने मान्य केलेले असून मॅनेजमेंटने केलेल्या विनंती नुसार व वरिल एकंदरीत परिस्थितीचा आढावा घेवून ॲक्शन प्लॅन तुर्तास स्थगीत ठेवल्याचा निर्णय कर्मचारी संघटनेने घेतलेला असुन सर्व कागारांनी याची नोंद घ्यावी.

कर्मचारी संघटना झिंदाबाद ! कामगार एकता झिंदाबाद !!

(प्रदीप मयेकर)
सरचिटणीस